# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ


दूरध्वनी क्रमांक. :
२५६०१२६४
२५६०१२६५
ई—मेल— pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग


संदर्भ — साफुपुवि/निववि/ १२७४ दिनांक १/९/२०१४

**तातडीचे**

प्रति,
मा.प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये.
मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था.

विषय — वार्षिक अहवाल सन २०१३—१४ साठी माहिती देणेबाबत.
( दि. १ जुलै २०१३ ते ३० जून २०१४ पर्यंत)

महोदय/महोदया,

विद्यापीठाचा वार्षिक अहवाल सन २०१३—२०१४ तयार करण्याचे काम सध्या या विभागात सुरु आहे. वरील नमूद केलेल्या संदर्भींकित पत्रान्वये वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी आवश्यक असणारी माहिती आपणाकडून मागविण्यात आलेली होती. वार्षिक अहवाल हा विधीमंडळाच्या सभापटलावर मंजूरीसाठी ठेवण्यात येत असल्याने सदर माहिती पाठविणे बंधनकारक असून देखील आजपर्यंत माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. ज्या महाविद्यालये/संस्थांनी यापूर्वी माहिती पाठविलेली आहे त्यांनी पुनःश्च माहिती पाठविण्याची आवश्यकता नाही.

आपणाकडून दिनांक **२० सप्टेंबर २०१४** पूर्वी माहिती प्राप्त झाली नाही तर आपल्या महाविद्यालये/संस्थेच्या नांवापुढे माहिती उपलब्ध नाही असे शासनास कळविण्यात येईल आणि त्याअनुषंगाने शासनाकडून व विद्यापीठाकडून मिळणारे विशेष अनुदान यावर विपरित परिणाम झाल्यास या सर्व होणा—या परिणामास वार्षिक अहवालाची माहिती न पाठविणारे महाविद्यालये/संस्था सर्वस्वी जबाबदार राहतील याची आपण गांभीर्याने नोंद घ्यावी तसेच आपल्या महाविद्यालये/संस्थेचा शासन स्तरावर /विद्यापीठ अनुदान आयोगाकडे केला जाणारा पत्रव्यवहार पुढील कार्यवाहीसाठी पाठविला जाणार नाही.

वरील सर्व बाबीचा गांभीर्याने विचार करुन वार्षिक अहवालासाठी आवश्यक असलेली माहिती या कार्यालयास **दि. २० सप्टेंबर, २०१४ पूर्वी** पाठवावी त्याचप्रमाणे या विभागाच्या pldvp@unipune.ac.in या ई—मेलवर माहितीची एक प्रत पाठवावी. या तारखेपर्यंत प्राप्त झालेल्या माहितीचा समावेश वार्षिक अहवालामध्ये केला जाईल.

कळावे,

२/९
उपकुलसचिव
नियोजन व विकास

प्रत —
मा. कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ७.
मा.संचालक, म.वि.वि.मं., सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ७